Also Available in e-Book

CBCS PATTERN

KAVAYITRI BAHINABAI CHAUDHARI
NORTH MAHARASHTRA UNIVERSITY

T.Y.B.Sc. • SEM V • PHY 503

# ATOMIC AND MOLECULAR PHYSICS


Dr. Prakash B. Ahirrao
Prof. Atul S. Sabadra
Dr. Mrs. Janhavi Talegaonkar






Prashant

PHYSICS

© Reserved

# ATOMIC AND MOLECULAR PHYSICS

**T.Y.B.Sc. (CBCS) | PHY-503 | Sem V**

**Publisher and Printer**
Prashant Publications
3, Pratap Nagar, Shri Sant Dnyaneshwar Mandir Road,
Near Nutan Maratha College, Jalgaon 425001.

**. Phone . Website . E-mail**
(0257) 2235520, 2232800
www.prashantpublications.com
prashantpublication.jal@gmail.com

**. First Edition . ISBN . Type Setting**
October, 2020
978-81-948015-7-3
Prashant Publication

**Price : ₹ 135/-**

*e-Books are available online at* www.prashantpublications.com
**Prashant Publications** *app for e-Books*
kopykitab.com • amazon.com • play.google.com

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted, in any form or by any means, electronic, mechanical, photocopying (xerox copy), recording or otherwise, without the prior permission.

Also Available in e-Book

**CBCS PATTERN**


KAVAYITRI BAHINABAI CHAUDHARI
NORTH MAHARASHTRA UNIVERSITY

T.Y.B.Sc. • SEM V • CH 503

# ORGANIC CHEMISTRY

## ORGANIC REACTION MECHANISM

M. T. Chaudhari
Prof. (Dr.) S. S. Rajput
Dr. M. K. Patel
Dr. H. P. Narkhede
Dr. P. S. Sathe
M. D. Birla





CHEMISTRY

As per U.G.C. Guidelines and also on the basis of revised syllabus of **Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University** with effect from June, 2020, Also useful for all Universities.

# ORGANIC CHEMISTRY

## ORGANIC REACTION MECHANISM

**T.Y.B.Sc. (CBCS) • CH-503 • Sem V**

- A U T H O R S -

**M. T. CHAUDHARI**
GDM Arts, KRN Commerce and MD Science College, Jamner

**Dr. Mrs. P. S. SATHE**
GDM Arts, KRN Commerce and MD Science College, Jamner

**Dr. H. P. NARKHEDE**
Smt. P.K.Kotecha Arts, Science and Commerce College, Bhusawal

**Dr. M. K. PATEL**
P.S.G.V.P. Mandal's
Arts, Comm. and Sci.College, Shahada

**Prof. (Dr.) S. S. RAJPUT**
Sau. V. Sansthe's Dadasaheb Rawal
Arts and Science College, Dondaecha.

**M. D. BIRLA**
Sau. R. N. Deshmukh Arts, Commerce and Science College, Bhadgaon

Prashant Publications

© Reserved

# ORGANIC CHEMISTRY

## ORGANIC REACTION MECHANISM

**T.Y.B.Sc. (CBCS) | CH-503 | Sem V**

**Publisher and Printer**
Prashant Publications
3, Pratap Nagar, Shri Sant Dnyaneshwar Mandir Road,
Near Nutan Maratha College, Jalgaon 425001.

**• Phone • Website • E-mail**
(0257) 2235520, 2232800
www.prashantpublications.com
prashantpublication.jal@gmail.com

**• First Edition • ISBN • Type Setting**
August, 2020
978-93-89501-84-1
Prashant Publication

**Price : ₹ 95/-**

*e -Books are available online at* www.prashantpublications.com
**Prashant Publications** *app for e-Books*
kopykitab.com • amazon.com • play.google.com

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted, in any form or by any means, electronic, mechanical, photocopying (xerox copy), recording or otherwise, without the prior permission.

महाराणा प्रतापसिंह शिक्षण संस्था मुंबई संचलित

# आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,वैभववाडी जि.सिंधुदुर्ग - ४१६८१०, महाराष्ट्र


२०२० या महाराष्ट्र राज्याच्या हिरक महोत्सवी वर्षानिमित्त

इतिहास विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी विभाग आयोजित

आंतरविद्याशाखीय ऑनलाइन राष्ट्रीय परिषद – २०२०

## "महाराष्ट्राच्या जडणघडणीतील ६० वर्षे- चळवळी व विकासाचे प्रवाह (१९६० ते २०२०)"

शनिवार दि. ३० मे, २०२०



महाराणा प्रतापसिंह शिक्षण संस्था मुंबई संचलित

## आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वैभववाडी जिल्हा- सिंधुदुर्ग, महाराष्ट्र.


कार्यकारी मंडळ

मा. नाम. विनोदजी श्रीधर तावडे - अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. विश्वनाथ रा. रावराणे - उपाध्यक्ष | श्री. रघुनाथ क. रावराणे - कार्याध्यक्ष |
| श्री. दयानंद पा. रावराणे - सचिव | श्री. शैलेंद्र स. रावराणे - सहसचिव |
| श्री. विजय बा. रावराणे - सहसचिव | श्री. अर्जुन बा. रावराणे - कोषाध्यक्ष |
| श्री. सदानंद द. रावराणे - सदस्य | श्री. प्रभानंद शं. रावराणे - सदस्य |
| श्री. गणपत दा. रावराणे - सदस्य | श्री. देवेंद्र ता. रावराणे - सदस्य |
| श्री. चंद्रशेखर म. रावराणे - सदस्य | श्री. यशवंत पा. रावराणे - सदस्य |
| श्री. जयसिंग प. रावराणे - सदस्य | श्री. सत्यवान बा. रावराणे - सदस्य |

म. प्र. शि. स. स्थानिक समिती

| | |
|---|---|
| श्री. सज्जन वि. रावराणे - अध्यक्ष | श्री. वासुदेव दा. रावराणे - उपाध्यक्ष |
| श्री. प्रमोद पुं. रावराणे - सचिव | श्री. महेश धों. रावराणे - खजिनदार |
| श्रीमती. वीणा व. रावराणे - सदस्य | |

संयोजन समिती

| | |
|---|---|
| प्राचार्य डॉ. सी. एस. काकडे - अध्यक्ष | डॉ. बी. डी. इंगवले - उपप्राचार्य |
| प्रा. एस. एन. पाटील - समन्वयक | प्रा. डी. एम. सिरसट - समन्वयक (IQAC) |

सदस्य

| | |
|---|---|
| प्रा. एस. सी. राडे | प्रा. आर. बी. पाटील |
| प्रा. पी. एम. ढेरे | डॉ. डी. एस. कोरगावकर |
| प्रा. एस. बी. पाटील | प्रा. व्ही. बी. गोपुला |




Published by

Lulu.com
3101, Hillsborough St,
Raleigh, NC 27607,
United States.

9781716791543


# महाराष्ट्राच्या जडणघडणीतील ६० वर्षे - चळवळी व विकासाचे प्रवाह (१९६० ते २०२०)




मुख्य संपादक
प्राचार्य डॉ.सी.एस.काकडे

संपादक
प्रा. एस.एन.पाटील
प्रा.डी.एम.सिरसट

महाराणा प्रतापसिंह शिक्षण संस्था मुंबई संचलित
आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
वैभववाडी जिल्हा- सिंधुदुर्ग, महाराष्ट्र.
मुंबई विद्यापीठ कायम संलग्नित
ISO 9001:2015 Certified

Price: 200/-

"महाराष्ट्राच्या जडणघडणीतील ६० वर्षे- चळवळी व विकासाचे प्रवाह

(१९६० ते २०२०)"

प्राचार्य डॉ. सी. एस. काकडे
प्रा. एस. एन. पाटील
प्रा. डी. एम. सिरसट

**© 2020 by Authors**
All rights reserved. No part of this publication may be reproduced or transmitted, in any form or by any means, without prior permission of the author. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages. [The responsibility for the facts stated, conclusions reached, etc., is entirely that of the author. The publisher is not responsible for them, whatsoever.]

**ISBN—978-1-71679-154-3**

**Published by,**
**Lulu Publication**
3101 Hillsborough St,
Raleigh, NC 27607,
United States.

| | | |
|---|---|---|
| 13 | PSYHO-LEGAL EFFECTS OF LOCKDOWN DUE TO COVID-19<br>C.A. Shailesh Dattatraya Borkar | 86 |
| 14 | प्रसार माध्यमे<br>प्राध्यापक किशोर शेषराव चौरे | 90 |
| 15 | महिला सबलीकरण आणि शिक्षणाची भूमिका: एक सर्वेक्षणात्मक अभ्यास<br>डॉ. दिपक प्रभाकर बाविस्कर | 95 |
| 16 | महिला सबलीकरण<br>प्रा. दिपाली पाटील | 98 |
| 17 | संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अमृत डांगे यांची भूमिका<br>डॉ. ज्ञानोबा तुकाराम कदम | 103 |
| 18 | महाराष्ट्रातील दलित चळवळीत दलित पँथर या संघटनेचे योगदान<br>प्रा. चौधरी गोपाल विश्वनाथ | 112 |
| 19 | महाराष्ट्रातील सहकार<br>स. प्रा. डॉ. नामदेव बाबुराव डोंगरे | 116 |
| 20 | शहरीकरणाचा महाराष्ट्रीयन समाजावरील प्रभाव: एक चिकित्सक परिक्षण<br>Dr. Kailash M. Fulmali | 119 |
| 21 | "आधुनिक महाराष्ट्राच्या वाटचालीतील प्रसार माध्यमांची भूमिका"<br>प्रा. ओमराज म.गजभिये | 124 |
| 22 | २१ व्या शतकातील महिला सबलीकरणातील आव्हाने<br>प्रा. डॉ. गजानन मुरलीधर खेकाडे | 127 |
| 23 | महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्थे समोरील आव्हानांचा चिकित्सक अभ्यास<br>डॉ. गट्टी गणपत विष्णू | 131 |
| 24 | महाराष्ट्राचे आरोग्य-प्रगती आणि आव्हाने<br>डॉ जयश्री टी. कापसे | 134 |
| 25 | वैचारिकता आणि आधुनिक महाराष्ट्र<br>काळणे कांतराव किसनराव | 140 |
| 26 | महाराष्ट्र राज्यात महिला सक्षमीकरणासाठी 60 वर्षाच्या विकासात्मक योजना<br>प्रा. डॉ. कल्पना एम. कवाडे | 143 |

# महिला सबलीकरण

प्रा. दिपाली पाटील

इतिहास विभाग, श्रीमती प. क. कोटेचा महिला महाविद्यालय भुसावळ.

भारतीय संस्कृती स्त्रियांना आदराचे व मानाचे स्थान आहे. यत्र नार्यस्तु पुजते रमन्ते तत्र देवता ज्या राज्यात महिलांचा सन्मान केला जातो असा समाज प्रगतीची शिखरे गाठतो. अशा आशयाचे सुभाषित आहे. राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी निम्मी लोकसंख्या महिलांची आहे. त्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास साधल्या शिवाय राज्याचा विकास होणे शक्य नाही

समान मानव माना स्त्रीला

तिची अस्मिता खुडू नका

दासी म्हणून पिटू नका

देवी म्हणून बघू नका.

समाजात स्त्रियांना समानतेची वागणूक मिळावी अशी अपेक्षा या ओळींमधून व्यक्त होते निसर्गाने स्त्री आणि पुरुष अशा दोन जाती निर्माण केल्या. कालांतराने मानवाने स्वार्थी वृती डोळ्यासमोर ठेवून सामाजिक मतभेद निर्माण केल्याचे दिसून येते हजारो वर्षापासून सामाजिक राजकीय, आर्थिक शैक्षणिक, हक्कांपासून महिलांना वंचित ठेवले. आज शिक्षणामुळे ती सर्व क्षेत्रात पायरोवून उभी आहे हे कौतुकास्पद आहे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत स्त्री वर्गाला मतदानाचा अधिकार नाकारला होता. हे पुरुषप्रधान संस्कृतीचे विदारक सत्य आहे स्त्री-पुरुष समते साठी अन्यायाला वाचा फोडण्यासाठी तिचे जीवन अधिक सुरक्षेचे सन्मानाचे व्हावे म्हणून महिला सबलीकरणाची आज गरज आहे. हे प्रस्तुत शोध निबंधात मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे

**संशोधनाचे उद्देश**

१. महिला सबलीकरणाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमी चा शोध घेणे.

२. महिलांची सामाजिक स्थिती अभ्यासणे

३. महिला सबलीकरणतील समस्यांचे अध्ययन करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोध निबंधाच्या अध्ययनासाठी दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आलेला आहे यामध्ये पुस्तके, मासिके, वृत्तपत्रातील लेख आणि इंटरनेटवरील माहिती याचा उपयोग शोधनिबंध तयार करण्यासाठी करण्यात आलेला आहे.

वेदकालीन स्त्रीजीवन

वेदकाळात स्त्रियांचा दर्जा श्रेष्ठ होता पुरुषांच्या बरोबरीने मनाचे स्थान होते सर्व क्षेत्रात त्याचे संदर्भ सापडतात. पितृसत्ताक कुटुंब पद्धती अस्तित्वात असली तरी स्त्रियांना विवाह कुटुंब शिक्षण धर्म संपती इत्यादी बरोबरीचे स्थान होते नंतरच्या काळात लोप होत गेला. या काळात वैदिक संहिता, ब्राह्मणके, उपनिषिदे इत्यादी ग्रंथांची निर्मिती झाली. उत्तर वैदिक कालखंड रामायण, महाभारत या धर्मग्रंथांची झाली आणि स्त्रियांवर अनेक बंधने लादली गेली. स्मृती पुराणाच्या काळात स्मृतीकारानी स्त्रियांवर जाचक बंधने लादली. मनूने मनुस्मृती च्या माध्यमातून स्त्रियांना विवाह, कुटुंब, शिक्षण, राजकारण, संपनी इत्यादी पासून वंचित ठेवलंय सार्वजनिक सहभागावर बंदी घातली अनेक अनिष्ट प्रथा सुरू झाल्या.

मध्ययुगीन स्त्रियांचे जीवन

परकीय आक्रमणामुळे सामाजिक परिस्थितीत परिवर्तन घडून आले. स्त्रियांना सुरक्षिततेच्या दृष्टीने घरात राहावे लागले परकीय आक्रमणाच्या काळात शारीरिक अत्याचार वाढल्याने स्त्रियांची कार्यशक्त कमी होऊन तिचे क्षेत्र चूल व मूल एवढेच मर्यादित झाले. स्त्रियांघरात आणखी बंदिस्त झाल्या. त्यांचे समाजातील स्थान गौण होऊन बंधने वाढली. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्त्रियांना आदराचे व मानाचे स्थान दिले. भक्ती आंदोलनाच्या माध्यमातून संतांनी स्त्रियांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी भजन व कीर्तनाच्या माध्यमातून जागृती करण्याचा प्रयत्न केला. काही बंधने शिथिल होण्यास मदत झाली. परंतु स्त्रियांचा सामाजिक दर्जा खालावला. परंपरांचा प्रभाव वाढू लागला. त्या परावलंबी होऊ लागल्यात. स्त्रिया स्वतंत्रपणे अर्थार्जन करू शकत नव्हत्या. पेशवे काळात मुलीचा जन्म हीन मनाला जाऊ लागला, मुलगा होण्या साठी यज्ञ होऊ लागले स्त्रीयांचा सामाजिक दर्जा घसरला.

ब्रिटिशकालीन स्त्रियांचे जीवन

ब्रिटिश राजवटीचा महाराष्ट्रात उदय झाला तेव्हा समाजावर जीर्ण परंपरावादी विचारांचा पगडा होता. सामाजिक विषमता असल्यामुळे त्याचा फारच विपरीत परिणाम झाला. स्त्री जीवनाला थारा नव्हता. महाराष्ट्र भूमीत जे राष्ट्रपुरुष जन्माला आले त्यांनी स्त्रियांच्या उद्धाराची चळवळ सुरू केली स्त्री शिक्षण हा महिला सबलीकरण साठी महत्वाचा टप्पा होय. महात्मा फुलेंनी शिक्षणाचे दालन स्त्रियांसाठी खुले केले. महिला सबलीकरणात सर्वात महत्वाची बाब म्हणजे स्त्रीला माणूस म्हणून जगण्याची संधी देऊन तिचे व्यक्तिमत्व विकसित करण्यासाठी प्रयत्न करणे, शिक्षण महिला सबलीकरणातील महत्वाचा टप्पा होता हे महात्मा फुलेनी ओळखले. त्यांनी समता प्रधान समाज निर्मितीसाठी सावित्रीबाईंना शिक्षण दिले, तो वारसा राजर्षी शाहूमहाराज डॉ. आंबेडकरनी पूढे चालविला. त्यांच्या विचारसारणी नुसार महाराष्ट्रच्या जडणघडणीतील चळवळी व विकस साधला जात आहे.

सबलीकरणाचा अर्थ/अपेक्षा

स्त्रियांचे सबलीकरण हा शब्द परवलीचा झाला आहे परंतु त्याबाबत मोठ्याप्रमाणात गैरसमज आहे म्हणून सबलीकरण या संकल्पनेचा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. सबलीकरण म्हणजे अशी प्रक्रिया ज्या व्यक्तीला आपल्या वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनातील निर्णय घेण्यात क्षमता विकसित करता येते. उत्पादन साधनांवर नियंत्रण प्रस्थापित करण्यात येते व त्याद्वारे आत्मविश्वासात वाढतो व स्वावलंबी होता येते.

महिलेला सबल करणारी सशक्त करणारी महिलेची दुर्बलता नष्ट करणारी. अर्थात मानसिक व बौद्धिक स्वतत्वांची तिला ओळख पटवून तिच्यात स्वतःबद्दलची जागृतता निर्माण करून त्यादृष्टीने सशक्त करणारी एक संकल्पना होय. महिला सबलीकरण म्हणजे त्यांची आर्थिक सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात झालेली प्रगती.

महिलांच्या सबलीकरणाचा प्रश्न खरं म्हणजे स्त्री ही अबला नसून सबला आहे हे वास्तव सत्य स्त्री-पुरुष दोघांनी मान्य कार्याचे आहे हा केवळ समजुतीत बदल करण्याचा प्रश्न आहे मात्र तो साधा सरळ राहिलेला नसुन ती जटील समस्या बनविली गेली आहे. भारतात प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांची क्षमता सिद्ध झाल्याची इतिहासात नोंद आहे. भारताच्या राज्यघटनेने स्त्री पुरुष समानता मान्य केली आहे स्त्रियांचा सन्मान, रोजगार ,आरोग्य आधी प्रश्न १९७५ नंतर ऐरणीवर आले याची चर्चा दैनिक व्यासपीठावर होऊ लागली , आदर्शवाद आणला गेला. स्त्रीमुक्तीची सामुहिक संघर्षाची परिभाषा सबलीकरणाच्या परिभाषेत मान्यता मिळाली. १९८० च्या दशकात उदारीकरणाच्या धोरणामुळे सबलीकरणाची संकल्पना रुढ झाली. भारत सरकारने २००१ हे वर्ष महिला सबलीकरण वर्ष म्हणून घोषित केले व स्त्रियांच्या सबलीकरणासाठी राष्ट्रीय धोरण जाहीर केले. त्यानुसार अनेक उपाययोजना राबविल्या परंतु अपेक्षित महिलांचे सबलीकरण होताना दिसत नाही.

सरकारी प्रयत्न व योजना

महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर महिला सबलीकरण यासाठी विविध स्तरावर प्रयत्नांना सुरुवात झाली. मुळात महाराष्ट्राची भूमी वीरांची क्रांतिकारी विचारसरणीची आहे. फुले, शाहू, आंबेडकरांचा वरसा या भूमीला लाभला आहे महाराष्ट्राच्या जडणघडणीत ६० वर्षांचा विचार करता. महिलांच्या सबलीकरणासाठी प्रत्येक क्षेत्रातील प्रगतीसाठी काही स्त्रीमुक्ती चळवळी झाल्या, स्त्रीमुक्ती संघटना आल्या तिचे शोषण थांबले पाहिजे यासाठी अनेक महिला कार्यकर्त्यांनी स्त्रीमुक्तीची आंदोलने केली अधिकार प्राप्त करून दिले एका अर्थाने अधिकाराची प्राप्ती झाली सांस्कृतिक स्वातंत्र्य व सर्व क्षेत्रात वाव मिळाला. त्यांना मिळालेले हे स्वातंत्र्य म्हणजे स्त्रियांचे सबलीकरण होय या सबलीकरणासाठी वेळोवेळी सरकारने विविध कायदे केले जसे कामगार राज्य विमा कायदा, हिंदू विवाह कायदा, मातृत्व लाभ कायदा, हुंडा प्रतिबंध कायदा १९६१, गर्भपात कायदा १९७१, बालविवाह नियंत्रण कायदा १९७६, समान वेतन कायदा १९७६,

कौटुंबिक न्यायालय कायदा १९८४, १९९४ चे महिला विषयक धोरण, महिला आयोगाची स्तपणा, स्त्रियांचे असशील प्रदर्शन निवारक कायदा १९८६, लैंगिक अत्याचार विरोधी कायदा, घरेलू हिंसा प्रतिबंधक कायदा २००४ आशे विविध कायदे करून महिला सबलीकरणा साठी प्रयत्न केले. सरकारने महिला सबलीकरणासाठी अनेक कायदे केले तरी प्रत्यक्षात मात्र स्त्रियांना या कायद्याचा प्रयोग किती झाला तर या प्रश्नाचे उत्तर आपल्याला मिळते की स्त्रियांना यापासून पाहिजे तसा फायदा झाला नाही कारण प्रत्यक्षात मात्र या कायद्याची अंमलबजावणी करताना येणारे अडथळे निर्णय प्रक्रियेतील दिरंगाई लक्षात येते.

सबलीकरणाचा समोरील आव्हाने

१. असुरक्षित वातावरण
२. लैंगिक छळाच्या प्रमाणात २०% वाढ झाल्याचे दिसते
३. उच्चपदस्थ महिलांना सहकाऱ्यांकडून उचित सन्मान दिला जात नाही
४. राखीव जागा असल्या तरी नोकरी कपात धोरणामुळे निर्माण झालेली समस्या

महिला सबलीकरणाचे उपाय

१. स्त्रियांना त्यांच्या क्षमतेची पुरेपुर जाणीव होण्याकरिता पूरक वातावरण तयार करणे व त्यांना निर्णय घेण्याचा अधिकार देणे
२. आर्थिक, सामाजिक, संस्कृती व राजकीय क्षेत्रत पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना कायद्याने स्थान देणे
३. शेती, कामगार, कारखानदार मजूर इत्यादींना समान वेतन
४. ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणासाठी प्राधान्य देऊन मानसिकता बदलणे
५. मुलींना त्यांच्या शारीरिक बदलाविषयी माहिती देणे
६. महिलांना योग्य आहार देणे
७. सरकारने चर्चासत्रे शिबिरे घेऊन महिलांना स्व हक्क व अधिकार याबाबत जाणीव जागृती करून देणे
८. पुरुषी अहंकार बाजूला ठेवून स्त्रियांचे अधिकार मान्य करावे.
९. महिलांना घराबाहेर पाठविण्याची मानसिकता बदलणे आवश्यक आहे
१०. महिलांसाठी स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे

आजची परिस्थिती

आजच्या परिस्थितीचा आढावा घेतला दर एक हजार पुरुषांच्या मागे ८३० महिला महाराष्ट्रात आहे भारतात हा आकडा ९३३ इतका आहे जळगाव आणि बीड आणखी पाच जिल्ह्यात हे प्रमाण ८५० च्या खाली आहे. शून्य ते सहा वयोगटातील महिलांचे प्रमाण २००१ च्या जनगणनेनुसार हे प्रमाण तेरा एवढे होते महिलांच्या आरोग्याचा प्रश्न मोठा आहे. महिला कुपोषित असली तर कुपोषित मूल जन्माला

येते. ग्रामीण भागातील, आदिवासी भागातील महिलांची परिस्थिती विदारक आहे. सबलीकरणाची त्यामुळे गरज आहे. इतर राष्ट्रांच्या तुलनेत महाराष्ट्रात महिला सबलीकरण साठी अनेक एनजीओ सरकारी योजना त्या दुर्गम भागापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

आजच्या स्त्रीला राजकीय, सामाजिक, अर्थीक विकासाची संधी मिळाली असली तरी तीचा लाभ समाजातील मुठभर महिला घेताना दिसतात. ग्रामीण भागातील राजकीय, सामाजिक चित्र फारसे बदलले नाही आजही त्यांचे जीवन कष्टाचे व हालाकीचे आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी महिला सबलीकरण होणे आवश्यक आहे. शहरातील महिला अर्थार्जनासाठी बाहेर पडल्यात पण त्यांची सामाजिक कौटुंबिक जबाबदारी कमी झालेली नाही. घरातील कामे मुलांचे संगोपन जबाबदारी, वृद्धांची जबाबदारी, सामाजिक व कौटुंबिक सोहळ्यांना उपस्थिती यामुळे तिची तारेवरची कसरत सुरु आहे तसेच अनेक कायदे तिच्या बाजूने असले तरीही त्यासाठी बाहेरील वातावरण सुरक्षित दिसत नाही. स्त्रियांवर होणारे अॅसिड हल्ले त्यांची होणारी छेडछाड बलात्कार, जाळून टाकली यासारख्या बातम्या आपण दररोज टीव्ही वृत्तपत्रात पाहतो वाचतो असुरक्षित वातावरणामुळे तिचे मनोबल खचत आहे तरीदेखील समाज भान जागृत ठेवून राष्ट्र उभारणीच्या कामात पुरुषांच्या बरोबरीने उभी आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीत महिला सबलीकरणाचा विचार करता इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्राला समाजसुधारणेची असलेली परंपरा त्यातून हा वारसा पुढे चालविण्या ची परंपरा निर्माण झालेली दिसते. स्त्रियांचा राजकारणात वाढणारा प्रभाव.

संदर्भ

१. अरुंधती पाटील, स्त्री: आत्मभान ते सक्षमीकरण एक प्रवास, अरुण प्रकाशन, लातूर
२. भारताचे संविधान, विधी व न्याय मंत्रालय महाराष्ट्र राज्य मुंबई.
३. घनश्याम शहा, भारतातील सामाजिक चळवळी, सेज पब्लिकेशन इंडिया लिमिटेड मुंबई
४. प्रबोधनपर साहित्य स्वरूप व संकल्पना, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ
५. प्रबोधनपर वैचारिक वाङ्मय, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ
६. https://www.artofliving.org/in-mr/project/women-empowerment
७. https://www.maharashtra.gov.in/1150/Acts-Rules
८. https://gad.maharashtra.gov.in/acts